दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर, बीपी, थायरॉड, अस्थमा तसेच मुंबई, पुणे, औरंगाबाद, लातुर, बार्शी, सोलापुर, नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक, पाटोदा रोड, मांजरसुंबा ता.जि.बीड

छत्रपती संभाजीनगर || वर्ष २ रे || अंक २१० || रविवार, १४ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी खमारी जिल्हा परिषद बूथ कमिटीची बैठक संपन्न

दैनिक सूर्योदय

निश्चल येनोरकर भंडारा/

गोंदिया तालुक्यातील खमारी जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची कमेटी सदस्य, पदाधिकारी व कार्यकर्ताची बैठक महात्मा ज्योतिबा फुले समाजभवन, खमारी येथे माजी आमदार राजेंद्र जैन, सुरेश हर्षे, केतन तुरकर, अखिलेश सेठ, रवी पटले, जगदीश बहेकार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली झाली.ङ्ग ङ्गमहायुती सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडली बहिन योजन, मुलींना उच्च शिक्षणात १०० टक्के फी माफ, शेतकऱ्यांना वीज माफ या सारख्या योजनांचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना घेता येईल यासाठी कार्यकर्त्यांनी सहयोग करावा. असे प्रतिपादन माजी आमदार श्री राजेंद्र जैन यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद क्षेत्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटन बांधणी करण्यासाठी बैठक घेण्यात येत असून जिल्हा परिषद क्षेत्रातील सर्व गावामध्ये प्रत्येक बूथवर क्रियाशील लोकांची कमेटी बनविणे कमिटीमध्ये महिला, युवक व सर्व घटकांच्या नवीन लोकांना जोडण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे, प्रत्येक गावांतील सक्षम बूथ कमेटी तयार करून संघटन मजबूत करने या वरच चर्चा करण्यात आली. खासदार श्री प्रफुल पटेल यांच्या सोबत आपण सर्व कार्यकर्ते खंबीरपणे उभे आहोत अशी भावना उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. ङ्गङ्गसर्व राजेंद्र जैन, सुरेश हर्षे, केतन तुरकर, अखिलेश सेठ, रवी पटले, जगदीश बहेकार, सुनील ब्राह्मणकर, तिलक पटले, प्रकाश गायधने, सुनील पटल, शैलेश वासनिक, राजेश तावाडे, कपिल बावनथडे, चैत्राम उके, मनोहर चव्हाण, राजेश मासिरकर, पवन धावडे, हरिचंद मेंढे, सदाशिव मेश्राम, भाऊलाल खैरवार, नरेंद्र रामटेके, श्रीराम निखाडे, विजय भांडारकर, शुभम शिवणकर, सचिन किरणापुरे, अशोक बावनथडे, बंशीधर अग्रवाल, कुणाल बावनथडे, कुलदीप गायधने, राजेश मेंढे, अखिलेश शेंडे, किरण बारापात्रे, दीपिका धावडे, लाजवंता तावाडे, आशा शिवणकर, वंचित गायधने, माधुरी बोहरे, भाग्यश्री लांडेकर, दुर्गा पाथोडे, मनोहर गुढगे, सहित मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.




# १५ जुलैपासून धानाचे चुकाऱ्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार माजी खा. सुनिल मेंढे यांच्या पाठपुराव्याचे फलित

दैनिक सूर्योदय

निश्चल येनोरकर भंडारा

रब्बी हंगाम २०२४ मधील शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावरून धानाची विक्री केलेल्या शेतकऱ्यांच्या चुकाराचे पैसे जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाले असून, १५ जुलैपासून शेतकऱ्यांच्या खात्यात वळते केले जाणार असल्याची माहिती माजी खासदार सुनील मेंढे यांनी दिली. ङ्गरब्बी हंगामात उत्पादित धानाच्या विक्रीसाठी शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र सुरू करण्यात आले होते. या केंद्राच्या माध्यमातून खरेदी केल्या गेलेल्या धानाचे मागील काही दिवसापासून चुकारे बाकी होते. ही रक्कम कोट्यावधीची होती. शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे मिळावे म्हणून माजी खासदार सुनील मेंढे यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या संबंधित यंत्रणेतील अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश येऊन काही दिवसांपूर्वी हे पैसे फेडरेशनच्या मुख्यालयाकडे प्राप्त झाले होते. दरम्यान त्यांनी हा निधी वळता करून आता जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांच्या खात्यात जमा केला आहे.



भंडारा जिल्ह्यासाठी २३ जून पर्यंत देय असलेले ३७ कोटी रुपये तर गोंदिया जिल्ह्यासाठी २० जून पर्यंत देयअसलेले ६५ कोटी रुपये जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. जमा झालेला हा निधी सोमवार १५ जुलैपासून शेतकऱ्यांच्या खात्यात वळता केला जाणार असल्याची माहिती मा. सुनील मेंढे यांनी दिली. शनिवार आणि रविवार सुट्टी आल्याने सोमवारपासून ही प्रक्रिया सुरू होणार असल्याचे ते म्हणाले. शेतकऱ्यांनी खरिपाची तयारी करून नव्या जोमाने शेती कामाला लागावे, असेही सुनील मेंढे यांनी सांगितले.

# सर्वसामान्य नागरिकांची अडवणूक न करता त्यांच्या कामाला गती द्या खा.डॉ. कल्याण काळे

भोकरदन प्रतिनिधी सद्दाम मिर्झा

भोकरदन येथे आढावा बैठकीत खासदार डॉ.काळे यांच्या अधिकाऱ्यांना सूचनादिनांक १० जुलै २०२४ रोजी नगर परिषद मंगल कार्यालय भोकरदन येथे जालना जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार डॉ.कल्याण काळे यांनी भोकरदन तालुक्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, तसेच सर्व शासकीय कार्यालयाच्या प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांची आढावा बैठक घेतली. तालुक्यातील नागरिकांना प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे व बेजबाबदार कृत्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय कार्यालयांचे वारंवार उंबरठे झिजवावे लागत असून वेळेवर काम होत नसल्याने हाल होत असून तालुक्यातील जनता त्रस्त आहे. याच पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार डॉ. कल्याण काळे यांनी सर्व शासकीय कार्यालयांच्या प्रमुख अधिकारी व विभाग प्रमुखांची विशेष आढावा बैठक घेतली. या बैठकीमध्ये विहिरींच्या कामांना तात्काळ मंजुरी द्या, वाळूचे साठे जप्त



करण्यासाठी कमिटी स्थापन करा, योजनांची अंमलबजावणी पूर्ण करा, सर्व कार्यालयीन कर्मचारी, अधिकारी यांनी कार्यालयात वेळेवर पूर्ण वेळ हजर राहावे,

अशा सूचना भोकरदन येथील नगरपरिषदेच्या सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत खासदार काळे यांनीङ्गसंबंधित अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना दिल्या. तसेच यावेळी माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी भोकरदन मध्ये चालू असलेल्या गर्भपात रॅकेटवर भाष्य करत भोकरदनचे नाव संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गर्भपात प्रकरणी बदनाम होत आहे असे म्हटले. या वेळी मा.आ.चंद्रकांत दानवे, नगराध्यक्ष राजाभाऊ देशमुख, बबलू शेठ चौधरी, नवनाथ दौड, बोरसे गुरुजी, तहसीलदार संतोष बनकर,

डी.वाय.एस.पी जी.एच दराडे, गटविकास अधिकारी गजानन सुरडकर, तालुका आरोग्य अधिकारी रघुवीर चंदेल, ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनंदा काथार यांची उपस्थिती होती. खा.कल्याण काळे यांनी सर्व कार्यालयांच्या कामाचा आढावा घेतल्यानंतर शासनाच्या योजनांचा पुरेपूर लाभ पात्र लाभार्थ्यांना तात्काळ मिळवून देण्यात यावा, एमआरईजीएस अंतर्गत विहिरींच्या लाभासाठी आलेले सर्व प्रस्ताव तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांना त्याचा लाभ देण्यात यावा, भोकरदन मध्ये सुरू असलेले अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावे, असे अधिकारी व कर्मचारी यांना निर्देशित केले. यावेळी तालुक्यातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..

# हरित नांदेड अभियाना अंतर्गत मनपाच्या सिडको क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

नांदेड :- जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, वृक्षमित्र फाऊंडेशन व गुरुव्दारा लंगर साहेब यांच्यासह इतर २५ सामाजिक संस्थांच्या सहभागातून नांदेड शहरात हरित नांदेड अभियानाची सुरुवात करण्यात आली होती. याच अभियानाचा पुढील टप्पा म्हणुन दिनांक १०.०७.२०२४ रोजी मनपा अति-आयुक्त श्री गिरीष कदम यांच्या हस्ते लातुर फाटा ते वसंतराव नाईक कॉलेज रोड सिडको परिसरात प्रातिनिधिक स्वरुपात वृक्षांची लागवड करण्यात आली.ङ्गङ्गआज हरित नांदेड अभियानांतर्गत लातुर फाटा ते वसंतराव नाईक कॉलेज रोड सिडको रोडवर अत्याधुनिक ट्री गार्डसह १२० वृक्षांची लागवड करण्यात आली. सदर अत्याधुनिक ट्री गार्ड सेल्फ वॉटरिंग पद्धतीचे असून यामध्ये १५ लिटर पाणी साठवण क्षमता आहे. यामुळे वृक्ष १००% जगणार आहेत तसेच या ट्री गार्ड मध्ये नऊ फुटाचे झाड लावण्यात आले असून दोन वर्षात हे झाड मोठे होणार आहे. वृक्ष लागवडीची सुरुवात मनपा अति-आयुक्त गिरीष कदम यांच्या हस्ते करण्यात आली.याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्यासह सहाय्यक आयुक्त संभाजी कास्टेवाड, कार्यकारी अभियता शिवाजी बाबरे,उद्यान अधिक्षक मिर्झा बेग,उपअभियंता अरुण शिंदे,कार्यालय अधिक्षक विलास गजभारे,अर्जुन बागडे,वसुली पर्यवेक्षक नागापुरकर,मारोती सारंग,मालु एनफळे,पठाडे,नथुराम चवरे,आंबटवाड,अर्चना जोंधळे,मिना अडबलवार व इतर क्षेत्रिय कार्यालयातील कर्मचारी तसेच सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, वृक्षमित्र मोहनराव पाटील घोगरे,ग्यानोबा जिरनाळे,एमजी गोंड,सुभाष शेटे,नामदेव पांचाळ,तेलंग मामा,रेणुका बाई,मायाबाई जाधव, विष्णुकांत तिडके,गिरी महाराज, निसर्गप्रेमींनी नागरीकाची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन वृक्षमित्र फाऊंडेशनचे संतोष मुगटकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रकाश झडते वृक्षमित्र यांनी केले.



# दहावी, बारावी लेखीपरीक्षेसाठी हेल्पलाईन सुरु

नांदेड, दि. १० जुलै :- महाराष्ट्र राज्य माध्यमिक वउच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने जुलै-

ऑगस्ट २०२४ मध्ये माध्यमिक वउच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडीअडचणीसोडविण्यासाठी लातूर विभागीय मंडळ स्तरावर सकाळी ८ ते सायं ८ पर्यंत इयत्तादहावीसाठी ०२३८२-२५१६३३ व इयत्ता बारावीसाठी ०२३८२-२५१७३३ या क्रमांकावर लातूरविभागीय मंडळात हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थी पालक व शाळाप्रमुखांनी आपल्या अडीअडचणी विषयी दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन लातूरविभागीय मंडळाचे विभागीय सचिव यांनी केले आहे.

तसेच नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक पुढील प्रमाणे आहेत. सहसचिव तथा सहा.सचिव श्रीमती भंडारी ए. आर.९४२२८८६१०१, ए. आर. कुंभार ९४०५०७७९९१, तसेच उच्च माध्यमिकसाठी एन.एन.डुकरे (व.अ) मो.नं.८३७९०७२५६५, एम.यु.डाळिंबे (व.लि) मो.नं.९४२३७७७७८९ तर माध्यमिकसाठी एस.एस. काथार मो ८२७५०४३११२, एस. एल. राठोड मो. ८८३०२९८१५८ या भ्रमणध्वनीवर संपर्क क्रमांक आहे. नांदेड जिल्ह्यासाठी संपर्क नांदेड जिल्ह्यासाठी समुपदेशक बी. एम. कच्छवे यांचा भ्रमणध्वनी ९३७१२६१५००, बी.एम.कारखेडे मो.क्र.९८६०९१२८९८, पी.जी. सोळंके मो.क्र. ९८६०२८६८५७, बी. एच. पाटील ९७६७७२२०७१ यांचे भ्रमणध्वनी क्रमांक लातूर विभागीय मंडळाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहेत.

संपादकीय

# कुशीतले काटे!

लष्करी दादागिरी वा दुष्कृत्य करण्याआधी चीनने आपली आर्थिक खुंटी अनेक देशांत मोठ्या प्रमाणावर बळकट केली असून त्यामुळे त्या देशाचे आव्हान अधिक गंभीर ठरते. ते परतवू पाहणाऱ्या देशांनाही व्यापाराचा व्याप वाढवावा लागणारच.जे म्हणायचे ते म्हणायचे नाही आणि उद्देश तर कधीच उघड करायचा नाही ही आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीची दोन व्यवच्छेदक लक्षणे लक्षात घेतल्यास जपानमधील 'क्वाड' बैठकीचे प्रयोजन आणि फलित लक्षात घेणे सोपे ठरेल. या संघटनेचा मूळ उद्देश आहे चीन या महाकाय देशाला रोखणे. पण क्वाडच्या ध्येयधोरणांत कधीही त्याचा उल्लेख आढळणार नाही. वास्तविक क्वाड ही काही नवी संकल्पना नाही. गेले दशकभर काही ना काही निमित्ताने त्याचे अस्तित्व होते. पण अलीकडे या क्वाडला जरा गती आलेली दिसते. याचे कारण या संघटनेतील चारही देशांना चीन कमीअधिक प्रमाणात टोचू लागलेला आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान आणि भारत या क्वाडच्या चार सदस्यांची चीन ही चौरस वेदना आहे. या चौघांची चीन ठसठस आता वाढली आहे. त्याआधी चीनविरोधात कठोर भूमिका घ्यावी लागू नये म्हणून ऑस्ट्रेलियाने २००८ नंतर या क्वाडपासून दूर राहणे पसंत केले होते आणि अलीकडची गलवान खोऱ्यातली चिनी घुसखोरी लक्षात येईपर्यंत आपणही या क्वाडबाबत तितके उत्सुक नव्हतो. पण ऑस्ट्रेलियाच्या उंबरठय़ावरील सॉलोमन बेटावर चीनने लष्करी गुंतवणूक सुरू केली आणि ऑस्ट्रेलियास क्वाडच्या आधाराची गरज वाटू लागली. आपलेही तेच. तिकडे अमेरिकेस चीनविरोधात काही ना काही व्यासपीठ हवेच होते आणि चीनमुळे प्राण कंठाशी येतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाल्याने जपानही काही आधाराच्या शोधात होता. अशा तऱ्हेने या सर्वाच्या गरजा समान असल्याने या संघटनेचे पुनरुज्जीवन झाले आणि क्वाडमधे धुगधुगी निर्माण झाली. या संघटनेमागील सत्य हे इतकेच. ते एकदा लक्षात घेतले की जपानमधील या बैठकीच्या फलनिष्पत्तीविषयी उगाच फार अपेक्षा निर्माण होणार नाहीत. क्वाडच्या चार सदस्यांसह अन्य नऊ देशांचे प्रमुख, पंतप्रधान, अध्यक्ष वा अर्थमंत्री आदींनी दूरस्थ संवादाद्वारे या परिषदेत आपली उपस्थिती नोंदवली. हे एक या परिषदेचे वैशिष्टय़. दक्षिण कोरिया, मलेशिया, इंडोनेशिया, फिलिपिन्स, सिंगापूर, थायलंड, ब्रुनेई, न्यूझीलंड आदी देशांचा या अन्य सहभागींत समावेश आहे. या १३ देशांनी मिळून 'हिंदू-प्रशांत महासागर आर्थिक गट' स्थापन करण्याचा निर्णय या बैठकीत घेतला गेला. या सर्व सहभागी देशांकडे नजर टाकली असता क्वाडचे चार सदस्य देश आणि हे अन्य यातील एक समान धागा लक्षात यावा. तो म्हणजे चीन. हे सर्वच्या सर्व देश चीनच्या काही ना काही उपद्व्यापांमुळे त्रासले असून त्यावरील उतारा म्हणून ते सर्व अमेरिकेभोवती कोंडाळे करताना दिसतात. अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सलीव्हन यांनी या गटाचे वर्णन 'बेकर्स डझन' असे केले. मध्ययुगीन काळात इंग्लंडमधील पाव विक्रे ते फसवणुकीचा आरोप होऊ नये म्हणून डझनभर पाव घेणाऱ्यास आणखी एक पाव देत. त्यावरून 'बेकर्स डझन' हा शब्दप्रयोग जन्मास आला. त्यातील डझन हा शब्द एकूण सदस्य संख्या १३ दर्शवतो. अपेक्षेप्रमाणे या बैठकीत युक्रेन युद्धाचा मुद्दा चर्चिला गेला. त्यावर जपान आणि अर्थातच अमेरिका यांनी सडेतोड भूमिका घेतली आणि रशियाचा तीव्र शब्दांत धिक्कार केला. भारतास त्या वेळी यापासून लांब राहावे लागले. पुतिन आणि त्यांच्या नेतृत्वाखालील रशियाचा साहसवाद हा जागतिक स्तरावर अनेकांच्या निषेधाचा विषय असला तरी आपण त्याबाबत तटस्थ राहण्याचे ठरवलेले असल्याने असे होणे नैसर्गिक. यातूनच या सर्व देशांस बांधणारा चीन हा एकच एक मुद्दा असल्याचे अधोरेखित होते.पण तरीही सद्य:स्थितीत चीनच्या नावे खडे फोडणे वा बोटे मोडणे यापेक्षा अधिक काही हे देश एकेकटय़ाने अथवा क्वाड संघटना मिळून करू शकणार नाहीत. असा ठाम निष्कर्ष काढण्याचा आधार म्हणजे व्यापार तूट. याबाबतच्या आकडेवारीवर नजर जरी टाकली तरी चीनविरोधात शड्डू थोपटण्यातील पोकळपणा लक्षात येईल. व्यापार तूट (ट्रेड डेफिसिट) म्हणजे दोन देशांत होणाऱ्या व्यापार व्यवहारातील फरक. या संदर्भात चीन आणि हे सर्व देश यांचा विचार व्हायला हवा. तो केल्यास दिसते ते असे की या सर्व देशांत स्वतंत्रपणे अथवा एकत्रितपणे चीनकडून जितकी निर्यात होते त्याच्या एकदशांश प्रमाणातही आयात होत नाही. म्हणजे चीनकडून या देशांस होणारी विक्री आणि त्याच वेळी या देशांकडून चीन करीत असलेली खरेदी यात प्रचंड तफावत असून ती हे चारही देश एकत्र आले तरी भरून निघणारी नाही. उदाहरणार्थ अमेरिका-चीन व्यापार तूट सुमारे ४०,००० कोटी डॉलर्स इतकी प्रचंड आहे तर जपानशी असलेली ही तूट ३,००० कोटी डॉलर्स इतकी आहे. भारत चीनकडून जितके काही घेतो आणि चीनला जे काही विकतो त्यातील फरक आहे ४,४०० कोटी डॉलर्स इतका. गतवर्षीपर्यंत ऑस्ट्रेलिया हा एकच देश असा होता की ज्याची चीनशी व्यापार तूट नाही. या सगळय़ाचा अर्थ असा की हे क्वाडमधील चारही देश वा अन्य डझनभर देश हे अन्य कोणत्याही देशापेक्षा अनेक

# रोटरी क्लब चिपळूणचा पदग्रहण सोहळा थाटा संपन्न

उपेक्षित जनसामान्यांच्या व पर्यावरण संरक्षणासाठी काम करणार... नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा. पालशेतकर यांचे प्रतिपादन.ङ्ग ङ्गचिपळूण (ओंकार रेळेकर) रोटरी क्लब चिपळूणच्या अध्यक्षपदी सूत्रे प्राध्यापक रोटे. अविनाश पालशेतकर यांनी बुधवारी झालेल्या दिमाखदार सोहळ्यात स्वीकारले. मोठ्या दिमाखदार सोहळ्यात बेळगाव विभागाचे रोटरी डिस्ट्रिक्ट ३१७० चे डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी रोटे. अशोक नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला सण२०२४ –२५ या वर्षासाठी रोटे अविनाश पालशेतकर यांनी मावळते अध्यक्ष रोटे धनंजय आंबुर्ले यांच्याकडून अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. सचिव म्हणून रोटे राजेश ओतारी लँड डेव्हलपर, खजिनदार म्हणून रूफ टॉप चे मालक रोटे स्वप्निल चिले यांनी पदग्रहण केले.ङ्गयावेळी प्रमुख पाहुणे रोटे अशोक नाईक यांनी आपल्या मनोगताने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले. भौतिक सुखांच्या महत्त्वकांक्षाशेपोटी माणसाची




संवेदना आणि समाजाची असलेली बांधिलकी कमी होऊ लागली आहे. याचे वैषम्य वाट असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. आनंद आणि सुखाच्या शोधात माणसाने अनेक कष्ट करून काही गोष्टी प्राप्त केल्या पण त्याला समाधान मिळाले नाही. नोकरी उद्योगाच्या यशोशिखरांवर असणाऱ्या रोटेरियंस ना व नागरिकांना त्यांनी आवाहन केले तुम्हीही समाजातील अपेक्षित घटकांसाठी आपला वेळ, बुद्धी व संपत्ती काही प्रमाणात खर्च करा जेणेकरून त्यांच्या आयुष्यातही सुखाचे दिवस येण्यास तुमचे योगदान असेल असे ते म्हणाले.ङ्ग नूतन अध्यक्ष रोटे अविनाश पालशेतकर यांनी सांगितले रोटरी क्लब ची स्थापना १९७४ साली चिपळूणचे श्री निशिकांत जोशी (नानासाहेब), श्री राजाभाऊ रेडीज डॉ. सुरेश जोशी व अन्य लोकांनी केली होती व त्यांचे प्रथम अध्यक्ष राजाभाऊ रेडीज यांनी भूषविले होते. आज या रोटरी क्लब ला एका छोट्याशा रोपट्यापासून एक वटवृक्ष तयार झाले आहे. याची पूर्णपणे जबाबदारी व छान समाज उपयोगी असे कार्यक्रम करुन देण्याचे आश्वासन रोटे अविनाश पालशेतकर यांनी केले. समाजातील गरजू उपेक्षितांना मदत करण्यासोबत पर्यावरण, शिक्षण व वैद्यकीय उपक्रमांवर आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. चिपळूणमध्ये सुशोभीकरण व स्वच्छता करण्यावर माझा भर असणार आहे. नगरपालिकेच्या काही जागा नगरपालिकेच्या सहकार्याने घेण्याचा माझा मानस आहे. यामध्ये सर्व चिपळूण वासियांचे मला सहकार्य हवे किंबहुना चिपळूणातील सर्व नागरिकांनी चिपळूण हे आपले शहर नसून घर असल्याप्रमाणे व सर्वपक्षीय राजकीय नेते व प्रशासन हे आपले कुटुंब प्रमुख आहेत यांच्या सहकार्याने मला आपल्या सर्वांचे शहर सुशोभित करायचे आहे. रोटरी क्लब चिपळूणचे सचिव रोटे राजेश ओतारी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले. या सोहळ्याला चिपळूण आतील बहुतांश प्रतिष्ठित व्यापारी व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते .माननीय भास्कर शेठ जाधव, माननीय शेखर जी निकम, माननीय रमेश जी कदम, माननीय प्रशांत जी यादव अधिवेशन असल्याने यांचे कुटुंबीय या कार्यक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

# श्री रविप्रभा मित्र संस्थेच्या वतीने रा. जि. प. शाळा चांदोरे येथे शैक्षणिक साहित्य वाटप.आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळांमधुनच शिक्षण द्या. त्यांची गुणवत्ता वाढवा.. प्रदिप सुतार निवृत्त शाखा अभियंता.

द. रा. जि. प्रतिनिधी: संतोष उध्दरकर

म्हसळा: दि. १२ जुलै रोजी माणगाव तालुक्यातील चांदोरे येथील रा. जि. प. शाळा चांदोरे येथे आंतरराष्ट्रीय मानवअधिकार एवं सामाजिक न्याय संघटन चांदोरे यांच्या प्रयत्नाने तसेच श्री रविप्रभा मित्र संस्था यांच्या सौजन्याने १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आणि अंगणवाडीतील चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. प्रथम उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून सरस्वती मातेला पुष्पहार अर्पण करण्यात आले व शाळेच्या वतीने गुलाबाचे झाड देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले, यावेळी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र लाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांला शिक्षण जेवढे महत्वाचे आहे तितकेच पर्यावरण देखील महात्वाचे आहे,विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षा द्यावीत, संस्थेच्या माध्यमातुन होणाऱ्या स्पर्धा परिक्षेमध्ये सहभागी व्हावेत असे आवाहन केले, तसेच निवृत्त शाखा अभियंता प्रदिप सुतार यांनी विद्यार्थ्यांना ऊत्तम मार्गदर्शन केले, पालकांनी आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेमधुनच शिक्षण द्यावे ही काळाची गरज आहे, जिल्हा परिषद शाळांची








अवस्था खुप बिकट आहे, कुठे १० तर कुठे १५ या प्रकारे पटसंख्या पहायला मिळत आहे ही खेदजनक बाब आहे, मोठमोठे आधिकरी, तसेच थोर मंडळी देखील जिल्हा परिषद शाळांमधुनच शिक्षण घेतले आहे, मग आपण का नाही आपल्या मुलांना जि. प. शाळेत शिक्षण देऊ शकत, या बद्दल खंत देखील व्यक्त केली, चांदोरे सरपंच साक्षी शिंदे यांनी श्री रविप्रभा संस्थेच्या माध्यमातुन होणारे उपक्रमाचे कौतुक करीत या पुढे मुलांच्या हिताचे काही असेल तर नक्कीच आम्हाला सहकार्य करावे अशी विनंती देखील केली,यावेळी कार्यक्रम ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र लाड,उपाध्यक्ष नरेश विचारे ,निवृत्त शाखा अभियंता प्रदिप सुतार, सचिव संतोष उद्धरकर, खजिनदार सुशांत लाड, सदस्य समीर लांजेकर, संतोष घडशी, किशोर घुलघुले,ङ्गग्रामपंचायत सरपंच साक्षी शिंदे, सदस्य सुरेश चाचले, सायली चाचले, सुधा लोखंडे, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी चंद्रकांत चांदोरकर, मंगेश भुवड, माजी सरपंच कृष्णा गोरेगावकर, विष्णु भोसले अंतर्राष्ट्रीय मानवधिकार संघटनेचे तालुका अध्यक्ष बाळाराम तांबे, विभागीय अध्यक्ष नंदकुमार चांदोरकर, उपाध्यक्ष गणेश दिवेकर, सचिव सुधीर दिवेकर, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शाळा समिती सदस्य संतोष तळकर, प्राथमिक शाळा चांदोरे मुख्याध्यापक पवार सर, संगीता सुरशेट्टे, नळेफोडी शाळेचे शिक्षक ढोले सर, प्रेमकुमार कातकडेसर,सिकंदर लांडे सर निवाची नळेफोडीचे शिक्षक ङ्गसंतोष मळगे सर, तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला वर्ग,शालेय विद्यार्थी बहु संख्येने उपस्थित होते.

# आपण एकत्र यायला पाहिजे, राऊतांच्या विधानाने खळबळ

मुंबई : राज्यातील विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने कधीकाळी एकत्र असलेले अनेक जुने सहकारी एकमेकांना भेटले. या निवडणुकीसाठी शिवसेना उबाठा नेते आणि खासदार संजय राऊत विधिमंडळ परिसरात आले होते. त्यावेळी त्यांची आणि भाजप नेते चंद्रकांत पाटील यांची भेट झाली. या भेटीवेळी आपण एकत्र यायला पाहिजे, असे संजय राऊत यांनी चंद्रकांत पाटील यांना उद्देशून म्हटले. त्यानंतर राज्यातील राजकारणात पुन्हा नव्या समीकरणांची चर्चा सुरु झाली. राऊत यांच्या वक्तव्यानंतर दोन जुने मित्रपक्ष पुन्हा एकत्र येणार की काय? या चर्चेला उधाण आले आहे.

२०१९ ची विधानसभा निवडणूक भाजप आणि शिवसेनेने एकत्र लढवली. या युतीला जनतेने बहुमत दिले. परंतु निवडणूक निकालानंतर मुख्यमंत्री पदावरुन दोन्ही पक्षांमध्ये वाद सुरु झाला. त्यानंतर दोन्ही पक्षांनी वेगळी भूमिका घेतली आणि युती तुटली. त्यानंतर भाजपने अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा प्रयत्न केला. परंतु ते सरकार काही तासांमध्ये पडले. शेवटी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत शिवसेना गेली.



महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये मुख्यमंत्रीपद उद्धव ठाकरे यांना मिळाले. जून २०२२ मध्ये राज्यातील राजकारणात आणखी एक भूकंप झाला. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील ४० आमदारांना सोबत घेऊन आपला वेगळा गट स्थापन केला. ते भाजपसोबत गेले.

विधान परिषद निवडणूक निमित्ताने संजय राऊत आणि चंद्रकांत पाटील यांची भेट झाली. त्या भेटीत आपण एकत्र यायला पाहिजे, असे संजय राऊत यांनी म्हटल्यामुळे राज्यातील राजकारण पुन्हा बदलणार असल्याच्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

# प्रवाशांनी एसटीमध्ये प्रवासादरम्यान टाकलेल्या हजारो बाटल्यांचे संकलन..

निवेदिता प्रतिष्ठान जालगांव, सरस्वती विद्यामंदिर जालगांव दापोली आगार चा संयुक्त उपक्रम....

दापोली :- गेले वर्षभर निवेदिता प्रतिष्ठान आणि एसटी आगार दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने एसटी मधील व स्थानकावरील कचरा पुनर्वापर प्रकल्पाकडे पाठविण्याचा सातत्यपूर्ण यशस्वी प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाला दापोलीमधील शाळा व महाविद्यालयांचे सदोदित सहकार्य लाभत आहे.ङ्गया सातत्यपूर्ण कार्यक्रमानुसार दिनांक ११ जुलै रोजी सरस्वती विद्यामंदिर च्या सहकार्याने प्रवाशांनी प्रवास करताना एसटीत टाकलेल्या सुमारे साडेतीन हजार बाटल्या निवेदिता प्रतिष्ठान च्या जालगाव येथील संकलन केंद्रात जमा करण्यात आल्या.या बाटल्या यंत्रणेमार्फत आगारात प्रती दिन एका बाजूला जमा केल्या जातात व तीन महिन्यांतून एकदा निवेदिता प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेतर्फे पुनर्वापर प्रकल्पाकडे पाठवल्या जातात.ङ्गतसेच गाडीत व स्थानकावरील रॅपर्स चा (खाऊचा) कचरा देखील संस्थेतर्फेच पुनर्वापर प्रकल्पाकडे पाठवला जातो.११ जुलै रोजी झालेल्या प्लास्टीक बॉटल कलेक्शन प्रोग्रॅम मध्ये सरस्वती विद्यामंदिर चे विद्यार्थी मुख्याध्यापिका सारिका गुजराथी ,पंकज तुळपुळे सर आणि पल्लवी दाबके मॅडम यांचे विशेष सहकार्य लाभले. या संकलन कार्यात निवेदिता प्रतिष्ठान चे ज्येष्ठ सदस्य रमेश जोशी,साटम,महेश्वरी विचारे ,विद्याधर ताम्हणार ,सुनील चव्हाण,निवेदिता परांजपे,वैभवी सागवेकर ,प्रमोद रसाळ आणि अध्यक्ष प्रशांत परांजपे,आगार प्रमुख रेश्मा मधाळे,अधीक्षक मुनाफ राजापकर,प्रणव रेळेकर ,एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग लाभला.गेल्या वर्षभरात एसटीतील प्रवाशांनी प्रवास करताना एसटीत टाकलेल्या सुमारे दहा हजार पेक्षा अधिक बाटल्या पुनर्वापर प्रकल्पाकडे पाठवण्यात यश आल्याची माहिती निवेदिता प्रतिष्ठान चे अध्यक्ष प्रशांत परांजपे यांनी दिली.



# सदानंद पंडित यांचे निधन.

चिपळूण - स्वभावातील सरलता, सकारात्मक अखंड ऊर्जा देणारी विचारधारा ज्याने जीवनभर जपली असे तुरंबव (तालुका चिपळूण जिल्हा रत्नागिरी) गावचे ज्येष्ठ समाजसेवक श्री शारदा समाजसेवा मंडळ, अंतराळ मंडळ आधी सामाजिक संस्थांचे आघाडीचे कार्यकर्ते, जेष्ठ समाजसेवक सदानंद सिताराम पंडित यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अल्प आजाराने ठाणे येथे निधन झाले.ङ्गएक परोपकारी समाजकार्याची आवड असणारे, निरपेक्ष, निस्वार्थी तितकेच मृदू ,शांत, संयमी, सुस्वभावी व्यक्तिमत्व म्हणूनच ते जनमानसात ओळखले जात. अंगभूत बुद्धिमत्ता,मुद्देसूद मांडणी, कार्य कुशलता, संघटना कौशल्य, कल्पक नेतृत्व धाडसी निर्णय घेण्याची क्षमता ही त्यांची खासियत होती.सदानंद पंडित यांचे जाणे अनेक सामाजिक क्षेत्रातील मोठी हानी असून एक सन्मित्र, निष्ठावंत कार्यकर्ता सामाजिक संस्थांनी गमावला आहे.विश्वनाथ पंडित ९५८८४५०४४२



# स्वर्गीय मनोहर घोसाळकर व कुलस्वामिनी सेवा समिती मुंबई पाचरळ व कुणबी समाज मंडळ मुंबई पाचरळ यांच्या विद्यमाने शिक्षण साहित्य वाटप

मंडणगड प्रतिनिधी

आज दिनांक ११/७/२०२४रोजी जिल्हा परिषद मराठी शाळा पाचरळ या शाळेत स्वर्गीय मनोहर बाबाजी घोसाळकर व कुलस्वामिनी सेवा समिती मुंबई पाचरळ व कुणबी समाज मंडळ मुंबई पाचरळ यांच्या विद्यमाने वह्या ,पेन ,चित्रकलावही, स्केचपेन, पेन्सिल ,खोडरबर शार्पनर ,दप्तर ,पाणी बॉटल, छत्री शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमाला ग्रुप ग्रामपंचायत घोसाळे चे विद्यमान सरपंच श्री मनोज पवार, सुनील मालपेकर माजी शा. व्य. समिती अध्यक्ष, शिक्षण प्रेमी सदस्य श्री अरुण घोसाळकर ,अंगणवाडी सेविका सौअंकिता घोसाळकर, सौ.माधवी शिंदे अध्यक्ष शा.व्य.स.,सौ.प्रज्ञा बर्जे,श्री.ओंकार जंगम ,मुख्याध्यापक श्री संतोष करावडे सर व शिक्षक वृंद, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न करण्यात आला .



# बँक ऑफ इंडिया तळा शाखेत चाललय काय? केवायसी च्या नावाखाली नागरीकांना मारावे लागतात हेलपाटे.

तळा कृष्णा भोसले. तळा तालुका डोंगरी दुर्गम या तालुक्यात रोजगार नसल्यानेङ्गतरुण पिढी मुंबईत मग राहिलेल्या जेष्ठ, महीला, अशिक्षितङ्गकमी शिकलेल्या लोकांनी उरलेला हा तालुका या तालुक्यातङ्गअसणाऱ्या बँक ऑफ इंडिया शाखा तळा येथे सामन्य नागरीकांना केवायसी नावाखाली सारख्या फेरया माराव्या लागतात.

नागरीकांचे बँक ऑफ इंडिया तळा शाखेत मोठ्या प्रमाणात सेव्हिंग खाते आहेत. परंतु ते केवायसी करा असेङ्गसागितले जाते. केवायसी साठी नागरिक फॉर्म भरून देतात पण आठ पंधरा दिवस झाले तरी ते होत नसल्याने नागरीकांना मोठ्या समस्यांना तोंड दयावे लागत आहे. मग या बाबीना किती दिवस जातात हे तरी बँकेने स्पष्ट

करावे अशी नागरीकांनी मागणी केली आहे. डोंगर दुर्गम भागातील लोक पायी, एसटीने येतात बॅकेत तुफान गर्दी असते. पैसा जमा करणे, पैसा काढणे हे एकच काऊंटर असते, बँकेत सामान्य लोक दिवसभर रडतात. या बॅकेत सामान्य नागरिक अनेक शासकीय योजना, वृद्ध अबाल त्यासाठी धावत असताना या बाबतीत वरिष्ठ का लक्ष देत नाही असा प्रश्न पडला आहे. याबाबत तातडीने पाऊल उचलीत सामान्य नागरिकांचा खोळंबा थांबवावा अशी जोरदार मागणी केली जात आहे.

# तुम्हाला माहीत आहे का?

मराठी भाषिक जनतेत विज्ञानाचा प्रसार करून समाजास विज्ञानाभिमुख बनवावे व वैज्ञानिकांना समाजाभिमुख करून समाजाचे वैज्ञानिक प्रबोधन साधावे, यासाठी प्रयत्न करण्याकरिता स्थापण्यात आलेली विज्ञानप्रेमी नागरिकांची संघटना म्हणजे मराठी विज्ञान परिषद. सामान्य माणसाच्या ऐहिक समृद्धीचे सर्व प्रश्न विज्ञानाद्वारेच सोडविणे शक्य असल्याने विज्ञान व तंत्रविद्या यावरील जनसामान्यांचा विश्वास वाढविणे, हाही ही संघटना स्थापन करण्यामागील उद्देश आहे. समाजाच्या सर्व थरांत वैज्ञानिक ज्ञान पोहोचविण्यासाठी मातृभाषा हेच माध्यम नैसर्गिक आहे म्हणून संस्थेच्या नावात 'मराठी' या शब्दाचा समावेश करण्यात आला आहे.पूर्वपीठिका व स्थापना : आपला समाज विज्ञानासंबंधी उदासीन आहे व त्यामुळे वैज्ञानिक ज्ञानाची फार उपेक्षा होत आहे, याची जाणीव स्वातंत्र्यापूर्वी अनेक वर्षे भारतीयांना झाली होती. विज्ञानाची ही उपेक्षा थांबविण्यासाठी, महाराष्ट्रात मराठी भाषेतून विज्ञान-प्रसार करण्याकरिता झालेल्या प्रयत्नांत एक महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे १९२८ साली गो. रा. परांजपे यांनी आपल्या सहकारी मित्रांच्या सहकार्याने सुरू केलेले सृष्टीज्ञान हे लौकिक शास्त्रीय मासिक होय.मराठी साहित्य परिषदेच्या एकोणिसाव्या वार्षिक संमेलनाच्या वेळी डिसेंबर १९३४ मध्ये बडोदे येथे व ४२व्या अधिवेशनाच्या वेळी मे १९३०मध्ये ठाणे येथे विज्ञान-उपसंमेलने भरविण्यात आली. त्यामध्ये विज्ञान-प्रसारासंबंधी विचार मांडण्यात आले. असाच आणखी एक प्रयत्न मुंबईत मुंबई मराठी साहित्य संघाच्या १८व्या प्रादेशिक संमेलनाच्या वेळी जून १९६५मध्ये करण्यात आला. तथापि, हे प्रयत्न नैमित्तिक असून अपुरे पडतात, असे दिसून आले. विज्ञानप्रसाराचे कार्य व्यवस्थित, सुसंघटितपणे व सतत चालावे यासाठी एखाद्या प्रातिनिधिक संघटनेची आवश्यकता आहे, हे स्पष्ट झाले व म्हणून १९६६मध्ये मुंबई, पुणे, नागपूर व इतर ठिकाणच्या काही विचारवंतांनी आपापसात चर्चा करून अशी संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्याला अनुसरून २४ एप्रिल १९६६ रोजी मुंबई येथे मराठी विज्ञान परिषदेची स्थापना झाली. परिषदेच्या स्थापनेच्या कार्यात मधुकर ना. गोगटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

विस्तार : मुंबईच्या मागोमाग पुणे येथे (१९६७) व त्यानंतर महाराष्ट्रातील अनेक प्रमुख ठिकाणी आणि महाराष्ट्राबाहेर हैदराबाद व बडोदे येथे परिषदेचे विभाग स्थापण्यात आले. काही मोठय़ा शहरांत परिषदेचे अनेक विभागही आहेत. १९७१च्या मराठी विज्ञान संमेलनातील ठरावानुसार गावोगावच्या शाखांचे स्वायत्त विभागांत रूपांतर करण्यात आले आहे. स्वायत्त विभागांच्या कार्यात सुसूत्रता राहावी, समन्वय साधावा आणि अवश्य तेथे त्यांनी मदत करता यावी, या हेतूने मध्यवर्ती प्रातिनिधिक संघटना म्हणून १९७७मध्ये मराठी विज्ञान महासंघ स्थापन करण्यात आला आहे. तथापि, एखाद्या विभागाने महासंघाशी संलग्न होणे, न होणे ही त्या विभागाची ऐच्छिक बाब मानली जाते.

कार्यपद्धती : वैज्ञानिक ज्ञानाचा प्रसार व्हावा, यासाठी विविध शास्त्रीय विषयांवर सुबोध व्याख्याने, प्रात्यक्षिके, परिसंवाद, चर्चा, प्रश्नमंजूषा, शास्त्रीय प्रदर्शने, शिबिरे व सहली निरनिराळ्या विभागांतर्फे आयोजित केल्या जातात. शाळा व महाविद्यालये यामध्ये चालणाऱ्या शास्त्राभ्यास मंडळादी उपक्रमांना या विभागांचे सहकार्य व मार्गदर्शनही मिळते. कामगारांच्या संघटना, महिला मंडळे यासारख्या सामाजिक संस्थांमध्येही विज्ञान-प्रसारात्मक कार्यक्रम योजिले जातात.विज्ञान-प्रबोधन करण्यासाठी ग्रामीण परिसर हेच खरेखुरे क्षेत्र आहे म्हणून परिषदेच्या विभागांनी एक खेडे निवडून तेथे विज्ञान-प्रसाराचे कार्य चालवावे, असे आवाहन १९७५च्या हैदराबाद येथील विज्ञान संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात ग. स. महाजनी यांनी केले. त्यास अनुसरून पुण्याच्या मराठी विज्ञान परिषदेने किरकटवाडी येथे कार्यास आरंभ केला आहे. तेथे पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण, वृक्षसंवर्धन, विज्ञान प्रश्नमंजुषा, वैज्ञानिक चित्रपट प्रदर्शन इत्यादी कार्यक्रम घडवून आणले जातात. नागपूर विभाग कलमेश्वर येथे असेच उल्लेखनीय कार्य करीत आहे.मराठी विज्ञान महासंघ व स्थानिक स्वायत्त विभाग एकत्र किंवा स्वतंत्रपणे वार्षिक संमेलने भरवितात. ग्रामीण जनतेला त्यांचा फायदा मिळावा, यासाठी कित्येकदा ती तळेगाव दाभाडे, चिंचणी-नागपूर, किरकटवाडी अशा ग्रामीण भागांत भरविण्यात आली आहेत. वार्षिक संमेलनाच्या निमित्ताने त्या-त्या विभागाच्या अथवा जनसामान्यांच्या दृष्टीने मूलभूत महत्त्वाच्या समस्यांविषयी परिसंवाद वा चर्चासत्रे आयोजित केले जातात. उदा., उदगीर येथे भूमिजलाचा प्रश्न, कोल्हापूर येथे खाऱ्या जमिनीचा प्रश्न, मुंबईला कुपोषण, स्त्रियांचा विज्ञानात सहभाग, नागपूर येथे अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक वृत्ती वगैरे. वार्षिक संमेलनाच्या आनुषंगाने स्मरणिकाही प्रसिद्ध केल्या जातात. त्यात विशिष्ट स्थलकालानुरूप लिहिलेल्या लेखांचे संकलन केलेले असते. 'सह्याद्री', 'भारतीय अन्नसमस्या', 'दारूचे दुष्परिणाम' हे त्यापैकी काहींचे विषय होत.मराठी विज्ञान महासंघ आणि काही स्वायत्त विभाग स्वत:ची मासिक मुखपत्रे प्रसिद्ध करतात. मराठी विज्ञान परिषद पत्रिका हे मराठी विज्ञान परिषद, मुंबई या संघटनेचे आणि मराठी महासंघ विज्ञान हे मराठी विज्ञान महासंघाचे मुखपत्र आहे. परिषदेचा अंबरनाथ विभागही स्वत:चे एक मुखपत्र चालवितो. शास्त्रीय माहिती देणाऱ्या या मुखपत्रांचे काही विशेषांकही प्रसिद्ध केले जातात. उदा., मुंबईच्या मराठी विज्ञान परिषद पत्रिकेचा मे १९७८ चा प्लास्टिक विशेषांक.

मराठी विज्ञान परिषद, मुंबई, मराठी विज्ञान परिषद, पुणे व मराठी विज्ञान महासंघ या संघटनांना शासकीय मान्यता मिळालेली आहे.

# आषाढीला व्हीआयपी दर्शन बंद

सोलापूर : मुख्यमंत्र्यांच्या पूजेच्यावेळी होणारी व्हीआयपी गर्दी टाळण्यासाठी देण्यात येणाऱ्या पासेसवर नियंत्रण आणण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. असल्याची खंबीर भूमिका सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केली. प्रशासनाने कठोर भूमिका घेत सर्वच बड्या व्हीआयपी व्यक्तींनाही झटपट दर्शन



वास्तविक मंदिराचा गाभारा, सोळखांबी लहान असल्याने जास्त व्हीआयपी आत आले तर मुख्यमंत्र्यांसह महत्वाच्या व्यक्तींना अनावश्यक गर्दीला सामोरे जावे लागते यामुळे मंदिर समितीशी ठरवून महापुजेला मर्यादित व्हीआयपींना प्रवेश देण्याचा प्रयत्न असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

याशिवाय महापूजा सुरु असताना मुखदर्शनाची रांग सुरूच राहणार असून महापूजा कमीतकमी वेळेत करण्यासाठी मंदिर समितीशी चर्चा केली जाणार असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. आषाढी यात्राकाळात दर्शन रांगेत हजारो भाविक असताना बंद केलेले व्हीआयपी दर्शन हे बंदच राहणार असून सर्वसामान्य भाविकांना झटपट दर्शन मिळण्यासाठी प्रशासन सज्ज देण्यास मनाई केल्याने बाकीचे घुसखोरी करणारे तथाकथित व्हीआयपी यांची घुसखोरी बंद झाली.

यामुळेच १५ तास रांगेत उभे राहणारे भाविक केवळ ४ ते ५ तासात आता देवाच्या पायापर्यंत पोहचत आहेत. याच पद्धतीने भाविकांना लवकरात लवकर दर्शन मिळण्यासाठी प्रशासन काम करत असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. दर्शन रांगेतील भाविकांना १५ लाख शुद्ध पाण्याच्या बाटल्या आणि मँगो ज्यूस दिला जाणार असून वापरलेल्या प्लास्टिक बाटल्या गोळा करून त्या नष्ट करण्यासाठी वेगळी यंत्रणा उभी केल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे


दैनिक
# सूर्योदय
रविवार, १४ जुलै २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## तळा तालुक्यात प्रचंड पाऊस पडूनही लोक तहानलेले.ना धरणे, ना रोजगार नागरिक देशोधडीला!

तळा कृष्णा भोसले. रायगड जिल्ह्यातील शेवटचा तालुका तळा हा डोंगरी, दुर्गम तालुका जाहीर झाला. २५ वर्ष लोटले परंतु इथे ना धरणे, ना उन्हाळ्यात पाणी त्यामुळे हाताला काम नसल्याने नागरीक गाव सोडून हाताला रोजगार मिळेल तिकडे घर बंद करून गेली आहेत. तालुक्यातील सर्वच गावे पिण्याच्या पाण्याची नळ पाणी पुरवठा योजना व्दारे लाखो रुपयांचे लाईट बिल भरत पाणी पित आहेत. शेतीला पाणी नसल्याने जमिनीत पिके घेऊ शकत नाही. पिके पावसाच्या पाण्यावर एक वेळ घेऊन तेङ्गपरवडत नाही. अशा स्थितीत इथल्या शेतकर्यांनी आपल्याङ्गजमिनी




हातच्या गमावून बसला आहे. ङ्ग धो धो पडणारे पाणी न अडविल्याने ते समुद्राच्या पाण्याला जाऊन मिळते. मग इथल्या नैसर्गिक संपत्ती कशाङ्गजपल्या जातील. इथे ना कुणी धरणे मागितली ना शेतीलाङ्गपाणी आणि राज्यकर्ते यांनी नेमक हेरून ही मुबंई, ठाणे, ङ्गपुणे, दिवा नालासोपारा यामध्ये कशी विस्थापित होतील हे आपोआप घडले. जो तो आपल्याला नोकरी, हाताला काम कसे मिळेल हे बघू लागले. आणि गावच्या गावे रिकामी झाली. ङ्ग फक्त निवडणुकीत गाडीत चहापाणी देऊन आणायची आणि पुन्हां सोडुन द्यायची हा क्रम सुरू झाला. यातही धन्यता मानणारी पुढारी मंडळी तयार झाली. गावच्या गावङ्गसारे आयुष्य त्या मुबंई पाठी चालले आहे. स्वत जन्म घेतलेल्या स्थानिक मायभुमीला मुकुन नागरिक कसबस जिवन जगत आहेत. याचा फार मोठा परिणाम या भागातङ्गहोत आहे. प्रतिक्रिया. ङ्ग या तालूक्यातील नागरीकांच्या हाताला कामधंदा नसल्याने येथील भुभीवर पाणी संचय नसल्याने सारी कुटुंब ची कुटुंबङ्गपोटापाण्यासाठी निघून गेली. रान ओस पडली. इथे पाणीङ्गअसते तर दोन तीन पिके वर्षाकाठी काढुन लोक सुखी जीवन जगले असते पण हे सार काळजीपूर्वक व्यवस्था सांभाळणारयानी केली गेली आहे.

गणेश निवाते.युवक कार्यकर्ता.हा हा म्हणता कॉरीडोरच्या नावाखाली जमिन विकल्या गेल्या तिथुन ना रोजगार ना मुंबई दिल्ली कोरीडॉर घरका नाङ्गघटका अशी स्थिती होऊन बसले आहे. यापुढे या भागातङ्गहाताला काम देणारे प्रोजेक्ट न आल्यास उरलीसुरली जनताङ्गगाव सोडून जातील

# भाजपा तर्फे पडवे जि.प.गट आबलोली परिसरात छत्री वाटप..!

आबलोली (संदेश कदम )

महाराष्ट्र राज्याचे सा. बां. मंत्री, गुहागर विधानसभेचे पालक,नाम.सन्मा .रवींद्रजी चव्हाण,रायगड लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख सन्मा.

सतीशजी धारप यांच्या नेतृत्वात आणि गुहागर विधानसभा निवडणूक प्रमुख डॉ.विनयजी नातू यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गुहागर विधानसभा मतदारसंघात गुहागर भारतीय जनता पार्टी गुहागर तालुका या पक्षाच्या वतीने छत्री वाटप हा कार्यक्रम यशस्वीपणे राबवीला जात असून या छत्री वाटप मोहिमेअंतर्गत गुहागर तालुक्यातील पडवे जिल्हा परिषद गट आबलोली परिसरात भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि राष्ट्रपती पदक विजेते प्रगतशील शेतकरी श्री. सचिन कमलाकर कारेकर यांच्या



आबलोली येथील गारवा कृषी पर्यटन केंद्राच्या हॉलमध्ये या छत्र्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टी गुहागर तालुका अध्यक्ष श्री. निलेश सुर्वे यांनी लोकसभा निवडणुकीत या पडवे जिल्हा परिषद गटाने केलेल्या बहुमोल सहकार्याबाबत सर्वांचे आभार व्यक्त केले. हे आभार व्यक्त करत असतानाच चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर करण्यात आलेली '' मुख्यमंत्री लाडकी बहीण'' या योजनेचे महत्त्व सर्वांना पटवून देत. ही योजना प्रभावीपणे आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत राबविण्याची सर्वांना विनंती केली. याचबरोबर सन्मा. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी जनतेच्या शेवटच्या घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केलेल्या आणि मंजूर केलेल्या सर्व योजनांची माहिती दिली. या परिसरातील उपस्थित असणारे सर्वांना मोफत छत्रीचे वाटप केले. यावेळी तालुका उपाध्यक्ष श्री. संदीप साळवी, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष श्रीमती. नम्रताताई निमुणकर, अनुलोमचे श्री मयुरेश पाटणकर, मासु गावचेचे माजी सरपंच पांडुरंग नाचरे, शांताराम नाचरे, मासु गावच्या विद्यमान उपसरपंच सौ.सिमरन नाचरे, मासूचे माजी सरपंच आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.विजय मसुरकर, विनायक सुर्वे,खोडदे माजी उपसरपंच अनंत मोरे, आबलोली माजी उपसरपंच बळीराम शिर्के, मनोज साळवी, सचिन कारेकर यांच्यासहित भारतीय जनता पार्टीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.माजी आमदार डॉ.विनयजी नातू यांच्या नेतृत्वात सलग दुसऱ्या वर्षी तालुक्यात करण्यात आलेल्या मोफत छत्री वाटपामुळे गुहागर तालुका भाजपमय होत असून भारतीय जनता पार्टी आणि समाजातील सर्व घटकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे

# खरवते – दहिवली येथे मातृ सुरक्षा दिन उत्साहात साजरा..!

आबलोली
(संदेश कदम)

चिपळूण तालुक्यातील शरदचंद्रजी पवार कृषि व कृषी संलग्न महाविद्यालय,खरवते दहिवली येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग,तसेच ॲग्रीव्हिजन कोंकण विभाग यांचे संयुक्त विद्यमाने मातृ सुरक्षा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचेवतीने डॉ.वर्षा खानविलकर जनरल फिजीशीअन,सावर्डे यांचे महिलांचे आरोग्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनितकुमार पाटील, विभाग प्रमुख प्रा.अश्विनी जाधव या उपस्थित होत्या.या कार्यक्रमाचे उदघाटन माजी खासदार,शिक्षण महर्षी गोविंदरावजी निकम साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.सर्व मान्यवरांचे



स्वागतानंतर डॉ.खानविलकर यांनी विद्यार्थिनींकरिता आरोग्य विषयक मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु. मृणालिनी चिंचोरे हिने तर आभारप्रदर्शन कु.सानिका जाधव यांनी केले.या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वतीने प्रा.पी.बी.पाटील यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले तर इतर प्राध्यापिका, शिक्षकेतर महिला कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक,व इतर विद्यार्थिनी या कार्यक्रमासाठी बहुसंख्येने उपस्थित होत्या.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मा.प्राचार्य यांचे विशेष मार्गदर्शन लाभले तर विभाग प्रमुख प्रा.हरिश्चंद्र भागडे,प्रा.सुशांत कदम, रा.से.यो.आणि ॲग्रीव्हिजन कोंकण विभाग च्या विद्यार्थी–विद्यार्थीनी यांनी यासाठी विशेष मेहनत घेतली.

# सावरी येथे ‘‘माझी लाडकी बहीण योजना बद्दल महिलांना मार्गदर्शन

मंडणगड,(प्रतिनिधी): मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना शासनातर्फे दरमहा १५०० रुपये दिले जाणार



आहेत.शासनाचे ध्येय महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली आहे.१ जुलैपासूनच या योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक महिला विविध तहसील कार्यालयात मोठी गर्दी करताना दिसत आहेत.ङ्गया योजनेसाठी महिलांची माहिती जमव्यासाठी जे कष्ट लागतील ते कमी करण्यासाठी विविध सरकारी विभागांकडे असलेली माहिती वापरण्याची कल्पना आहे,ग्रामीण भागात गावी जाऊन या योजनेसंदर्भात दापोली प्रांताधिकारी डॉ.अजीत थोरबोले, तहसिलदार श्रीधर गालीपेल्ले, गटविकास अधिकारी विशाल जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत सावरी ग्रामपंचायत कार्यालयात आयोजीत कार्यक्रमात माझी लाडकी बहिण या योजनेची महिलांना माहीती देण्यात आली.ङ्गयावेळी सरपंच सचिन चौरगे, उपसरपंच रामदास भागडे, ग्रामसेवक दिनेश जाधव, तलाठी मनोहर पवार, माजी सभापती आदेश केणे, शिवसेना तालुकप्रमुख प्रताप घोसाळकर, सुभाष भागडे, पोलीस पाटील प्रेरणा घोसाळकर,मंडळ अधिकारी प्रकाश साळवी, निलेश गोडगासे, गणेश बोले, प्रकाश शेडगे, अंगणवाडी सेविका सृष्टी तांबे, सायली तांबे, दिव्या पोस्टुरे, शैलेश घोसाळकर यांच्यासह ईतर मान्यवर यांच्या उपस्थित माझी लाडकी बहीण योजनेचे मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला.

# दापोली हर्णे येथे नौदल अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व स्वच्छता मोहीम

केळशी प्रतिनिधी :

महाराष्ट्र नौदल क्षेत्रामध्ये दि.०८जुलै ते १८जुलै २०२४ या कालावधीमध्ये महा कनेक्ट कार ड्राईव्ह २०२४ मार्गदर्शन तसेच








स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या माध्यमातून दि.१० रोजी भारतीय नौदलाची ही टीम दापोली हर्णे येथे हजर होऊन मासेमारी समुदाय, सागर रक्षक दलाच्या समस्या तसेच किनारपट्टी सुरक्षेच्या मुद्द्यांवर सामुदायिक संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.ङ्ग नौदलाचे कमांडर आसिफ मुल्ला,कमांडर सौजन्या श्री, कमांडर अंकेश बुंदेला यांनी इंटरनॅशनल बॉर्डर क्रॉस घ्यावयाची काळजी,मासेमारी करताना घ्यावयाची काळजी,कलर कोडींग,आपत्कालीन परिस्थितीमध्ये घ्यावयाची काळजी,सागर सुरक्षा,भारतीय नौसेनेमध्ये नोकरीच्या संधी अशा विविध विषयांवर तसेच मच्छीमार समुदाय व सागर रक्षक दलाच्या तसेच किनारपट्टी सुरक्षेच्या मुद्द्यावर सामुदायिक संवाद साधून मार्गदर्शन केले.संवाद कार्यक्रमानंतर सर्वांनी हर्णे येथील समुद्रकिनारी जाऊन स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.या नौदलाच्या कार्यक्रमासाठी खेड,दापोली,मंडणगड,बाणकोट,दाभोळ येथील पोलीस अधिकारी,पोलीस पाटील,सागर रक्षक दल सदस्य,मच्छिमार समुदाय, स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय पत्ता : लक्ष्मण फकिरबा कांबळे छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी संभाजीनगर पत्ता पैठण रोड बेस्ट प्राईस कांचनवाडी डेंटल हॉस्पिटल जवळ (संपादक आवृत्ती), संपर्क : ९०२२६४३७७३ किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )